परिपत्रक

क्रमांक कांन/स्लू • आर • ९२

पुणे, दिनांक २५/७/७४

विषय :- मुंबईचा तुकडे प्रतिबंधक व ज • ए का •१९४७ जमीन विक्रीची/गट विभाजनाची परवानगी देण्यास विलंब होण्याबाबत •

जमीन एकत्रीकरण योजना कार्यान्वित झाल्यानंतर जमिनीच्या हस्तांतराचे व्यवहार का • क • ११ (अ) व (ब) आणि त्या खालील नियम २७ यास अनुसरुन विभागीय आयुक्त अगर जिल्हाधिकारी यांचे पूर्वपरवानगीने पूर्ण करावे लागतात • अशी प्रकरणे अभिप्रायासाठी या कार्यालयाकडे प्राप्त झाल्यानंतर काही प्रकरणी विशिष्ट खुलाशासाठी ती एकत्रीकरण अधिकारी यांचेकडे पाठवली जातात • सदरच्या प्रकरणांत महसूल व वन विभागाकडील परिपत्रक क्र • स्लू • ए क्यू • सी ओ एन • ११६९/२७•७२७ न दिनांक १२-१-७० व दि • २०-५-७४ मधील आदेशाप्रमाणे अर्ज प्राप्त झाल्यापासून १ महिन्यात त्या बाबत योग्य ती कार्यवाही जिल्हाधिकारी/आयुक्त यांनी करावयाची आहे • संबंधी प्रकरणे एकत्रीकरण अधिकारी यांचेकडे खु खुलाशासाठी पाठवल्यानंतर त्याची पूर्तता तातडीने न झाल्याने परिणामी अंतिम कार्यवाहीस विलंब होतो• या प्रकरणी विलंब होणे शासन आदेशांशी विसंगत असल्याने अशी प्रकरणे एकत्रीकरण अधिकारी यांचेकडे प्राप्त झाल्यावर त्याची पूर्तता त्यांनी स्वतः लक्ष घालून प्राधान्याने कोठल्याही परिस्थितीत प्रकरण प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांत करणेची तजवीज ठेवावी • तसेच अशी प्रकरणे उपसंचालक, भूमि अभिलेख यांचे मार्फत पाठवताना उपसंचालकांनीही ती प्रकरणे तातडीने हाताळून ताबडतोब सादर करणेची कार्यवाही करावी •

सही/- र • अ • झवेरी,
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख (म • रा •) पुणे

स्थळ प्रतीवर ज • आ • आणि सं • भू • अ • यांची स्वाक्षरी असे/•

एकत्रीकरण अधिकारी (सर्व) यांजकडे

प्रतिलिपी :- (सर्व) उपसंचालक, भूमि अभिलेख/सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांना लागणाऱ्या प्रतीसह माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित •

न ा/१२७

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख (म • रा •) पुणे यांचेकरिता